# जिल्हा रुग्णालय, बीड

## राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या विविध योजनेअंतर्गत, विशेषज्ञांच्या कंत्राटी पदासाठी थेट मुलाखत (Walk-In - Interview)

राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या विविध योजने अंतर्गत, जिल्हा रुग्णालय बीड व अधिनस्त संस्थेत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात कंत्राटी पदधतीने भुलतज्ञ, बालरोगतज्ञ, फिजीशीयन, रेडीओलॉजीस्ट, स्त्रीरोगतज्ञ व जनरल सर्जन, मायक्रोबायोलॉजिस्ट, मानसोपचार तज्ञ, ई.एन.टी सर्जन इ.(विषेशज्ञांची) पदे भरावयाचे आहेत.

| अ.क्र. | विशेषज्ञ | शैक्षणिक अर्हता | सामाजीक आरक्षण | रिक्त जागा | आवश्यते नुसार भरावयाची पदे | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भुलतज्ञ (IPHS) | M.D.(Anes.) /D.A | अनुसूचित जाती-२, अनुसूचित जमाती-१, भ.ज.क.-१ वि.मा.प्र.-१, इ.मा.व.-२, खुला-१, आर्थिक दृष्टया दुर्बल घटक-१ | ४ | ० | ७५००० |
| २ | बालरोग तज्ञ (IPHS) | M.D.(Pedi)/ D.C.H./DNB | | ५ | १ | ७५००० |
| ३ | फिजिशीयन (IPHS) | M.D. (Medicine)/DNB | | ३ | २ | ७५००० |
| ४ | रेडीओलॉजीस्ट (IPHS) | M.D.(Rad.) /DMRD | | २ | १ | ७५००० |
| ५ | स्त्रीरोगतज्ञ (IPHS) | MS (Obgy)/DGO | | ९ | ४ | ७५००० |
| ६ | जनरल सर्जन (IPHS) | M.S.(General) | | ३ | १ | ७५००० |
| | **एकुण (आयपीएचएस)** | | | **२६** | **९** | |
| १ | भुलतज्ञ (ICU/HDU) | M.D.(Anes.) /D.A | अनुसूचित जाती-१, भ.ज.ब.-१, इ.मा.व.-१, खुला-२, आर्थिक दृष्टया दुर्बल घटक-१ | १ | १ | ७५००० |
| २ | बालरोग तज्ञ (DEIC) | M.D.(Pedi)/ D.C.H./DNB | | १ | १ | ७५००० |
| ३ | फिजिशीयन (Palliative care) | M.D. (Medicine)/DNB | | १ | १ | ७५००० |
| ४ | मायक्रोबायोलॉजिस्ट (IDSP) | M.D.(Microbiology) | | १ | १ | ७५००० |
| ५ | मानसोपचार तज्ञ (DMHP) | MD (Psychiatry)/DPM/DNB | | १ | १ | ७५००० |
| ६ | ई.एन.टी सर्जन (NPPCD) | M.S.(ENT )/DORL/DNB | | १ | १ | ७५००० |
| | **एकुण** | | | **६** | **६** | |

१५ व्या वित्त आयोग अंतर्गत नगरपरीषद बीड,परळी व अंबाजोगाई येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी polyclinic सुरु करण्यात आलेले असुन खालील प्रमाणे ऑन कॉल बेसेसवर विशेषज्ञ भरणे आवश्यक आहे.

| अ.क्र | पदाचे नांव (पार्ट टाईम) | शैक्षणिक अर्हता | रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | Physician | MD Medicine / DNB | ४ | 1) UPHC Parali,(Ganesh par) 2) UPHC Ambajogai, (Khadakpura) 3)UPHC Peth beed Beed 4) (UPHC Mominpura Beed) वरील आरोग्य संस्थेमध्ये प्रत्येकी एक पद मंजुर आहे |
| २ | Obstetrician | MD/ MS Gyn / DGO / DNB | ४ | |
| ३ | Pediatrician | MD Paed / DCH / DNB | ४ | |
| ४ | Opthalmologist | MS Opthalmologist / DOMS | ४ | |
| ५ | dermatologist | MD (skn/VD) DVD.DNB | ४ | |
| ६ | Psychiatrist | MD Psychiatry / DPM / DNB | ४ | |
| ७ | ENT Surgeon | MS ENT / DORL / DNB | ४ | |

१५ व्या वित्त आयोगा अंतर्गत **The Specilist will be paid an Incentive of, Rs 2000/- as Fixed amount & 100/- Rs per case basis)**

टिप १ :- कौन्सिलचे नोंदणी व पुनर्नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक .

अटी व शर्ती :-

१. जाहीरातीतील पदे ही राज्य शासनाची नियमीतची पदे नसुन सदरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत सदर पदांवर कायमपणाचा हक्क राहणार नाही.

२. निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती हि दिनांक २९ जुन २०२४ पर्यंत राहील व त्यानंतर राज्यस्तरावरुन प्राप्त सुचनानंतर पुनर्नियुक्ती देण्यात येईल.

३. अर्ज स्वीकृतीच्या शेवटच्या दिनांकास उमेदवारांचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे व कमाल वयोमर्यादा (खुल्या प्रवर्गासाठी ३८ व मागासप्रवर्गासाठी ४३ वर्षे ) या पेक्षा जास्त नसावे.

४. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखला झालेला नसावा.

५. सेवा निवृत्त विशेषज्ञ आणि अतिविशिष्ठ विशेषज्ञ या पदावर निवड झालेल्या उमेदवारास या पदाकरीताचे मानधन मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांच्याकडुन प्राप्त मार्गदर्शक सुचनानुसार अदा करण्यात येईल.

६. जाहिराती मधील रिक्त पदांच्या संख्येत व सामाजिक आरक्षणामध्ये बदल होवू शकतो तसेच रिक्त पदांच्या ठिकाणामध्ये बदल होवू शकतो.पदभरती स्थगीती करणे/रदद करणे व पदभरती प्रक्रिया या बाबचे सर्व अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,बीड यांनी राखुन ठेवलेले आहे. या बावत कोणलाही कसल्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

७. सविस्तर जाहिरात,पात्र अपात्र उमेदवारांची यादी,निवड/प्रतिक्षा यादी व पदभरती प्रक्रियेबाबची सर्व माहिती/सुचना राष्ट्रीय आरोग्य अभियान,बीड च्या नोटीस बोर्डवर व बीड जिल्हयाच्या संकेस्थळावर www.beed.nic.in येथे वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल या बाबत आर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही.

८. निवड झालेल्या उमेदवारांना निवड यादीतील गुणानुक्रमांच्या आधारे प्राधान्य क्रमाने पदस्थापना दिली जाईल या बाबत उमेदवारांनी कुठल्याही दबाव तत्रांचा वापर केल्यास सदर उमेदवारांची निवड रदद करण्यात येईल.

९. शासकिय,राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवाचाच विचार पदभरती/निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

१०.विशेषज्ञ/अतिविशिष्ठ विशेषाज्ञ या पदाकरीता शासकिय सेवेतुन/स्वेच्छानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी शासकिस सेवेत रुजू झालेचा दिनांक,कार्यकाळ,पदनाम,पदस्थापनेचे ठिकाण, सेवा निवृत्तीचे वर्षे,सेवा निवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व पेनशन या बाबची सपुर्ण माहिती अर्जामध्ये नमुद करावी.

११.विशेषज्ञ/अतिविशिष्ठ विशेषाज्ञ यांची वयोमर्यादा ७० वर्षे राहील व इतर रुग्णसेवेशी संबधीत पदांसाठी सेवा समाप्ती वयोमर्यादा ६५ वर्षे राहील. वय वर्षे ६० नंतर प्रत्येक वर्षी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडुन शारिरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाले नंतरच नियुक्ती/पुनर्नियुक्ती आदेश देण्यात येतील.

१२. पदासाठीचे वेतन हे एकत्रित प्रतीमहा मानधन आहे.

१३. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार जाहिरातीत नमुद केलेल्या पदांसाठी गठीत करण्यात आलेल्या निवड समितीमार्फत मुलाखती घेवून निवड प्रक्रिया राबविण्यात येईल.

१४. जाहिरातीत दर्शविण्यात आलेल्या पदांसाठी निवड प्रक्रिया पुर्ण करुन प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल व सदर यादी पुढील वर्षेभरात राष्ट्रीय आरोग्य अभियानात वेळोवेळी रिक्त होणाऱ्या पदांच्या भरतीकरीता वापरण्यात येईल.

१५. मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१६. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोई नुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१७. सदर पदभरती बाबतची न्याय प्रक्रिया ही जिल्हा सत्र न्यायालय बीड यांच्या न्याय कक्षेत मर्यादित असेल.

१८. अर्जासोबत उमेदवारानी लहान कुटुंबाचे प्रतीज्ञापत्र जाहीराती सोबत जोडण्यात आलेल्या विहीत नमुन्यात जोडणे अनिर्वाय आहे.

१९.आयपीएचएस अंतर्गतची स्पेशालिस्टची पदे ही वेळोवेळी रिक्त होणाऱ्या पदांच्या आवश्यकते नुसार भरले जातील.

**सदर पदांचे अर्ज सुटटीचे दिवस वगळुन आवक जावक विभाग जिल्हा रुग्णालय बीड येथे सादर करावेत.**

**टीप :-** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सदर पदाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास तसेच वेळोवेळी रिक्त होणाऱ्या विशेषज्ञांच्या पदांची थेट मुलाखत (Walk-In - Interview) यापुढे (सुटटीचे दिवस वगळुन ) दर महिण्याच्या चौथ्या मंगळवारी घेण्यात येतील. यापुढे यासाठी स्वतंत्र जाहीरात प्रत्येक वेळी दिली जाणार नाही.

| सदस्य | सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |
|---|---|---|---|
| जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक | जिल्हा शल्यचिकित्सक | जिल्हा आरोग्य अधिकारी | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| एनएचएम, बीड | जिल्हा रुग्णालय, बीड | जिल्हा परिषद, बीड | जिल्हा परिषद, बीड |